REGISTERED No. B 3424.






# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र


पुणें, बुधवार तारीख २३ जुलै १९४७ अंक ३०







## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

## पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.

१७२ गिरगांव रोड, मुंबई.

फोन नं. २२७३८

## रामतीर्थ ब्राह्मी तेल



[ स्पेशल नं. १ ]

सर्वत्र मिळतो.

पांढरे केस काळे होतात. स्मरणशक्ति वाढते. टक्कलावर केंस उगवतात. शांत झोंप येते. दृष्टि सुधारते. केंस लांबसडक होतात. केसांची नीट निगा राखते. डोकेंदुखी थांबते.

मोठी बाटली रु. ३-८-०, लहान बाटली रु. १-०-०

रामतीर्थ योगाश्रम, ४४८ सॅण्डहर्स्ट रोड, मुंबई ४




## साठे बिस्किटें

**ठराविक पुरवठा नियमितपणें दरमहा होत आहे. आतां माल सांचवून ठेवूं नका.**

प्रचलित सरकारी नियंत्रणामुळें बिस्किटांकरतां लागणारा योग्य तो कच्चा माल मिळणें अशक्य झालें आहे. तथापि त्यांतल्या त्यांत चांगला माल मिळेल तोच वापरण्याचा आमचा सतत प्रयत्न असतोच. तरी व्यापाऱ्यांनीं बिस्किटें जास्त दिवस सांचवून न ठेवतां शक्य तितका ताजा माल ग्राहकांस देण्याची जबाबदारी घेणें अधिक चांगलें।

साठे बिस्किट कंपनी, पुणें २.

-सर्व प्रांतांतील-
सुती — गरम — रेशमी
—खादीचें माहेरघर—

## खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
हमेंढेरे बोळाजवळ,
पुणें २

## विविध माहिती

**ब्रिटिश शेतीचें वाढतें उत्पादन**—ब्रिटिश शेतीचें उत्पादन गेल्या महायुद्धापासून ३५% वाढलें आहे व त्याच्या संकसपणांतहि ७०% भर पडली आहे. १९३८ सालीं ब्रिटिश शेतीचें उत्पन्न २८ कोटि पौंड होतें, तें आतां ५८ कोटि पौंडांवर गेलें आहे. शेतीचे आधुनिकीकरणाचा व यांत्रिकीकरणाचा हा मुख्यतः परिणाम आहे. गेल्या महायुद्धापूर्वी ग्रेट ब्रिटनमध्यें ५५ हजार ट्रॅक्टर होते; त्यांची संख्या आतां २ लाखांवर गेली आहे. घोड्यानें ओढावयाच्या नांगरांची संख्या उतरली आहे. ब्रिटिश शेतकामांत आतां ११ लक्ष लोक गुंतलेले आहेत.

**मध्यवर्ती सरकारच्या योजना**—मध्यवर्ती सरकारच्या शेतकी खात्यानें अधिक धान्य पिकविण्याच्या २२ योजनांना मंजुरी दिली आहे. या योजनांना एकंदर खर्च ७ लाख, ८७ हजार रुपये येईल असा अंदाज आहे. आसाम, बंगाल, मुंबई, मध्यप्रांत व मद्रास ह्यांना मिळून अधिक खत-पाण्यासाठीच ५ लाख, ५८ हजार रुपये मंजूर करण्यांत आले आहेत. याशिवाय बंगाल व वायव्य सरहद्द प्रांतांना पाणीपुरवठ्यासाठी ६० हजार रुपये देण्यांत यावयाचे आहेत. या सर्व योजना गेल्या मे महिन्यांत मंजूर झालेल्या आहेत.

**मध्यप्रांतासाठी खत**—मध्यप्रांत सरकारनें मध्यवता सरकारच्या कृत्रिम खतें तयार करण्याच्या योजनेंत भाग घेण्याचें ठरविलें असून त्यासाठी २५ लाख रुपये गुंतविण्याचें योजिलें आहे. त्याच प्रमाणें नागपूरजवळील एका नदीच्या काठच्या कोळशाच्या खाणींतहि २५ लाख रुपये गुंतविण्याचें मध्यप्रांत सरकारनें ठरविलें आहे.

**धान्य पिकविण्यासाठी जमीन**—मुंबई सरकारच्या अधिक धान्य पिकविण्याच्या मोहिमेला मदत म्हणून प्रांताच्या जंगल खात्यानें २०,७८० एकर जमीन शेतकी खात्याकडे दिली आहे.

**मुंबई प्रांतांतील संपांतील कालहानि**—मुंबई प्रांतांत एप्रिल, १९४७ मध्यें ७५ औद्योगिक कलह निर्माण झाले. या कलहांत १ लाखावर कामगार सामील झाले आणि त्यामुळें ५ लाखांवर कामाचे दिवस फुकट गेले.

**अमेरिकेचें प्रचंड हेलिकॉप्टर**—अमेरिकेच्या लष्करी विमान खात्यानें दोन एंजिनांचें एक मोठें हेलिकॉप्टर (सरळ उडूं शकणारें विमान) तयार केलें आहे. विमान अंतराळीं तरंगत असतांच त्यांतून प्रवासी उतरूं व [illegible] विमानांत वैमानिकांखेरीज १० उतारूंची सोय करण्यांत आलेली आहे. विमानाची गति ताशी ५० मैल आहे.

**सोन्याची संशयास्पद आयात?**—कराचीला आलेल्या एका परराष्ट्राच्या विमानांतून २० लाख रुपये किंमतीचें सोनें आढळून आलें. याबाबत अधिक तपास चालू असून तूर्त सोनें अडकावून ठेवण्यांत आलें आहे. जकात खात्याच्या अधिकाऱ्यांनीं मध्यवर्ती सरकारकडे या बाबतींत विचारणा केली आहे.

**जपानशीं खाजगी व्यापार**—जनरल मॅकार्थर यांनीं ४०० खाजगी व्यापाऱ्यांना जपानमध्यें व्यापार करण्याची परवानगी देण्याचें ठरविलें होतें. जपानमधील दोस्त राष्ट्रांच्या व्यापारी बोर्डानें त्यांची वाटणी पुढीलप्रमाणें केली आहे:—अमेरिका १०२, इंग्लंड व वसाहती ६४, हिंदुस्थान ३९, डच वसाहती २७, ऑस्ट्रेलिआ २३, फ्रान्स व फ्रेंच इंडोचायना १८, कॅनडा ८, न्यूझीलंड ६, फिलिपाइन्स ६, इतर ४५. सोव्हिएट रशिआच्या व्यापारी प्रतिनिधींबद्दल अद्याप विचार चालू आहे.


★ ही विजयपताका अखंड फडकत राहील ★

★ विमेदारांचें हितसंरक्षण. ★ संपूर्ण आर्थिक स्थैर्यता.
★ मध्यवर्ती सरकारकडे भांडवलापैकीं भरपूर ठेव.
★ व पहिलेंच मूल्यमापन यशस्वी.

याच कंपनींत विमा उतरून आपला व कंपनीचा भविष्य काल उज्ज्वल करा.

पूर्ण काम रु. ७२,९३,२००
एकूण जिंदगी रु. ३,४१,७३०-५-९
रिन्युअल खर्चाचें प्रमाण १६·७ टक्के
आयुर्विमा निधी रु. २,४५,५३६-६-९

सर्व प्रकारच्या विम्यासाठी

दि सुप्रीम म्यूच्युअल विमा कंपनी लि. पुणें २

—प्रतिनिधित्वासाठीं लिहा—

त्र्यं. दा. देशपांडे, बी. ए., एलएल. बी., सेक्रेटरी
व. न. म्हैसूर, एम. ए., एलएल. बी., मॅनेजर

सोलापूर येथील कंपनीच्या वसाहतीच्या योजना तयार होत असून लवकरच बंगले बांधण्याचें काम सुरू होईल.

# अर्थ

बुधवार, ता. २३ जुलै, १९४७




संस्थापक

प्रो. वा. गो. काळे


संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## हुंडणावळीच्या अडचणीमुळें आयातींवर बंधनें

१५ जुलै, १९४६ रोजीं प्रेसिडेंट ट्रूमन ह्यांनीं सही करून अमेरिकेनें ग्रेट ब्रिटनला द्यावयाच्या कर्जास अखेरचा कायदेशीरपणा प्राप्त करून दिला. अमेरिकेच्या दोन्ही विधिमंडळांनीं ह्या कर्जास आधीं मान्यता दिली होतीच, आणि मूळ कर्जाचा मसुदा प्रे. ट्रूमन व ब्रिटिश मुख्य प्रधान मि. ॲटली ह्यांनीं डिसेंबर, १९४५ मध्येंच जाहीर केला होता. ग्रेट ब्रिटनवर बंधनकारक असलेल्या कर्जाच्या अटींपैकीं महत्त्वाची एक म्हणजे, "एका वर्षाच्या अवधींत ग्रेट ब्रिटननें "डॉलर पूल" मोडून टाकावा; १५ जुलै, १९४७ नंतर स्टर्लिंग गटांतील कोणत्याहि देशास आपल्या डॉलर्समधील येण्याचा उपयोग स्वतःच्या इच्छेप्रमाणें करतां येईल" ही अट होय. आतां १५ जुलै, १९४७ ची तारीख उलटली असल्याकारणानें, निर्माण झालेल्या परिस्थितीची पहाणी करणें बोधप्रद होईल.

स्टर्लिंगमधील येण्याचें डॉलर्समध्यें किंवा सोन्यामध्यें रूपांतर करण्याची मागणी मोठ्या प्रमाणावर येऊं नये, अशी ग्रेट ब्रिटननें आगाऊच काळजी घेऊन ठेवलेली आहे. ह्या संबंधांतील तपशीलवार करार करण्यास पुरेसा वेळ मिळालेला नसल्याकारणानें, केलेले करार अल्प मुदतीचेच आहेत. इजिप्तशीं ग्रेट ब्रिटननें केलेला करार १९४७ अखेर संपत आहे; तोवर दीर्घकालीन योजनांची चर्चा करण्यास पुरेसा अवधी मिळेल. १५ जुलै, १९४७ पर्यंत साठलेल्या स्टर्लिंगमधील शिलकेंतून आपलें येणें इतर देशांना वसूल करावयाचें असल्यास त्याबाबत स्वतंत्र व्यवस्था करावी लागेल परंतु चालू व्यवहारांत उरणारें येणें त्यांना घेतां येईल, अशी सर्वसाधारण योजना आहे. पूर्वी स्टर्लिंगमध्यें सांठलेलें येणें मात्र एकदम वसूल करतां येणार नाहीं; प्रत्येकास त्याच्या येण्याचा फक्त कांहीं अंश मिळूं शकेल. ग्रेट ब्रिटनच्या वसाहती स्टर्लिंगवर ताण पडूं नये, ह्यासाठी आपलें परराष्ट्रांतील येणें स्टर्लिंगमध्येंच आपखुषीनें ठेवीत आहेत.

ग्रेट ब्रिटन, अँग्लो-अमेरिकन कराराच्या अटी पार पाडण्याची अशा रीतीनें तयार करीत असला तरी त्यास त्यांत मिळावयाचें यश त्याच्या धनकोंच्या सहकार्यावरच अवलंबून आहे. हिंदुस्थान किंवा इजिप्त ह्यांनीं आपल्या चालू येण्याच्या तात्काळ वसुलीचा आग्रह धरला तर ग्रेट ब्रिटनची योजना ढासळल्याविना रहाणार नाहीं. उभय पक्षांनीं समजूतदारपणानें दीर्घकालीन धोरण पत्करलें तरच सर्व कांहीं व्यवस्थित होईल. ग्रेट ब्रिटनच्या निर्गत व्यापारावर अँग्लो-अमेरिकन कराराच्या अटींचा प्रतिकूल परिणाम होईल काय? ग्रेट ब्रिटन ऐवजी अमेरिकेकडून इतर देश आतां माल मागवूं लागतील काय? एकाएकी अमेरिकेंतून माल आणवितां आला नाहीं, तरी कालांतरानें तसा परिणाम घडून येण्याचा संभव दिसतो. ग्रेट ब्रिटनची निर्गत कमी झाली, म्हणजे तो आपली आयात कमी करून येण्या-देण्यांतील तफावत दुरुस्त करूं शकेल, परंतु त्यासहि कांहीं मर्यादा आहे. स्टर्लिंगमधील येण्याची वसुली कांहीं अंशीं डॉलरमधून करून घेतां येईल, ह्या दृष्टीनें ब्रिटिश पौंडाचें आंतरराष्ट्रीय पैशाच्या बाजारांतील स्थान थोडेसें सुधारेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यांत येत आहे.

चालू वर्षाच्या प्रारंभीं परदेशी मालाच्या आयातीस मोठ्या प्रमाणावर परवाने देण्यांत आले, त्यामुळें हिंदुस्थानाच्या परराष्ट्रिय व्यापारी देण्या-घेण्यांत तूट येऊन स्टर्लिंगमधील साठलेल्या येण्याचा उपयोग करून घ्यावा लागला. १५ जुलै नंतर चालू देवघेवींतील स्टर्लिंगचें रूपांतर कोणत्याहि चलनांत होऊं शकेल, असें अँग्लो-अमेरिकन कर्जविषयक करार सांगतो. म्हणजे, पूर्वीप्रमाणें साठलेल्या येण्याचा आपणांस उपयोग करतां येणार नाहीं. हिंदी मालाची निर्गत करून व स्टर्लिंग येण्यांतून जें कांहीं येणें मिळेल तें मिळवूनच आपणांस आयातीची तरतूद करावी लागेल. अन्न व रेल्वे वहातुकीस लागणारा माल, ह्यांस प्राधान्य देऊन नंतर बाकीचा माल परवडेल तेवढा देशांत आयात होऊं देण्याचें धोरण हिंदुस्थान सरकारनें आखलें आहे. दारू, मोटारी, फाऊन्टन पेन्स, सिगारेटस, इत्यादि चैनीच्या वस्तूंच्या आयातीस हें धोरण जाचक होणार आहे. यंत्रसामुग्री मागविण्यास मात्र तात्काळ परवाने मिळतील. व्यापारांत एकाएकी खंड पडूं नये अशी दक्षता घेतली जात आहे.

## स्वतंत्र हिंदुस्थानाच्या नागरिकांवरील जबाबदारी

इंडियन इंडिपेन्डन्स बिलाचें ता. १८ जुलै रोजीं कायद्यांत रूपांतर झालें आणि अशा रीतीनें हिंदी लोकांवरील दीर्घकालीन ब्रिटिश वर्चस्वाचा अंत झाला. स्वातंत्र्याकरितां हिंदी लोकांचा दीर्घ काळ प्रयत्न चालू होता आणि आपलें स्वातंत्र्य जवळ येऊन ठेपलें असा विश्वास निर्माण होऊनहि तें इतकें सत्वर हातीं येईल अशी कल्पना नव्हती. पार्लमेंटानें हिंदी स्वातंत्र्याच्या योजनेस एकमतानें पाठिंबा दिला, ही गोष्ट महत्त्वाची आहे. ब्रिटिश मजूर मंत्रिमंडळानें हिंदी स्वातंत्र्याचे बाबतींत मनापासून लक्ष घातलें आणि चर्चिलसारख्या विरोधकांचाहि विरोध नष्ट करून, कालापहार न करतां हिंदी स्वातंत्र्याचें स्वप्न सत्यसृष्टींत उतरविलें. ह्या सर्व घटनेस हिंदुस्थानांतील लोकांची स्वातंत्र्याची तीव्र इच्छा कितपत कारणीभूत झाली, युरोपांतील परिस्थितीचें वजन कितपत पडलें व ब्रिटिशांचा हृदयपालट किती झाला, ह्याचा आढावा घेण्याचें आतां कारणच नाहीं. हिंदुस्थानाचा ह्यापुढील इतिहास उज्वल कसा करतां येईल, इकडेच आपलें लक्ष वेधून राहिलें पाहिजे. कोणत्याहि असमाधानकारक घटनेस ब्रिटिश राजवटीस जबाबदार धरण्याची सोय ह्यापुढें आतां कोणासच उरलेली नाहीं. स्वतःच्या पायावर उभें राहून संघटनेनें आपली प्रगति घडवून आणण्याची जबाबदारी आपण स्वखुषीनें पत्करलेली आहे. येणाऱ्या प्रसंगांस तोंड देऊन हिंदुस्थानाचें सर्व बाबतींत पाऊल पुढें पडावयाचें असल्यास, सर्वांनाच स्वार्थत्यागपूर्वक झटावें लागणार आहे.

स्वतंत्र हिंदुस्थानाच्या नागरिकांस ह्यापुढें कमी नव्हे, तर ज्यास्तच करभार सोसावा लागणार आहे. कालांतरानें त्याचीं फळें निश्चित चाखावयास मिळतील, हें ध्यानीं धरून सर्वांनीं जबाबदारीच्या जाणीवेनें वागणें श्रेयस्कर ठरणार आहे. अनेक पिढ्यांच्या स्वार्थत्यागानें व श्रमानें मिळविलेलें स्वातंत्र्य भरभक्कम व टिकाऊ करण्यासाठी कितीहि भार सहन करावा लागला तरी तो खुषीनें सोसण्याची तयारी जनतेनें केली पाहिजे.

## स्फुट विचार

### दर्यावर्दी वहातुकीसाठी हिंदी मालकीच्या बोटी

हिंदी बोटींच्या वहातुकीसंबंधीं रिकन्स्ट्रक्शन पॉलिसी सब-कमिटीचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला. ह्या अहवालांत दर्यावर्दी वहातुकीसंबंधीं करण्यांत आलेल्या शिफारसींना हिंदुस्थान सरकारनें आपला पूर्ण पाठिंबा दिला आहे. कमिटीनें हिंदी दर्यावर्दी वहातुकीविषयीं सुचविलेलीं उद्दिष्टें गाठण्यासाठी सहाय करण्याचा सरकारचा विचार स्वागतार्ह आहे. कमिटीनें वहातुकीसंबंधीं ५ ते ७ वर्षांच्या काळासाठी पुढीलप्रमाणें हिंदी कंपन्यांना वहातूक मिळण्याचीं उद्दिष्टें सुचविलेलीं आहेत:–किनाऱ्यावरील वहातूक १०० टक्के, ब्रह्मदेश, सिलोन वगैरे जवळील देशांकडील वहातूक ७५ टक्के, लांब पल्ल्याची वहातूक ५० टक्के आणि ॲक्सिस्ट राष्ट्रांच्या बोटींतून होणाऱ्या वहातुकीपैकीं ३० टक्के. हिंदी जहाज कंपनी कोणत्या कंपनीस म्हणावें, ह्या बाबतींत पुढील अटी सुचविण्यांत आलेल्या आहेत:– (१) कंपनीच्या बोटी हिंदींच बंदरांतून नोंदल्या असल्या पाहिजेत, (२) कंपनीच्या भागांपैकी आणि कर्जरोख्यांपैकीं ७५ टक्के हिंदी नागरिकांच्या मालकीचे असले पाहिजेत, (३) सर्व डायरेक्टर हिंदी असले पाहिजेत, (४) मॅनेजिंग एजंटस् असतील तर तेही हिंदींच असले पाहिजेत. ह्या शिफारसी सरकारला मान्य आहेत. तथापि, ह्या शिफारसी काटेकोर रीतीनें अमलांत आणल्या तर ज्यांत थोडेंफार परदेशी भांडवल आहे, अशा कांहीं मोठ्या कंपन्या 'हिंदी' या सदरांत पडणार नाहींत. वरील अटी तंतोतंत पाळणें अशक्य वाटल्यास तशा कंपन्यांनीं सरकारकडे हिंदी म्हणून घेण्यासाठी मंजुरी मागावी, अशी सवड सरकारनें ठेवली आहे. हिंदी व्यापारी बोटींचे बांधकामांत ब्रिटिश सरकार आणि आगबोट बांधणाऱ्या ब्रिटिश कंपन्या ह्यांचें सहकार्य मिळवितां आलें तर उत्तमच; पण त्याबरोबर हिंदुस्थानांत बोटी बांधण्यासंबंधी कमिटीनें केलेल्या शिफारसींचाही सरकार विचार करीत आहे. परराष्ट्रांकडून आयत्या बोटी मिळविण्याचेही प्रयत्न चालू आहेत.

### इमारतीसाठी पोलाद

हिंदुस्थानांतील मोठमोठ्या शहरीं राहत्या जागेची अत्यंत टंचाई आहे. नव्या इमारती बांधणारांना लागणारें पोलादाचें सामानही पुरेसें मिळत नाहीं. यासंबंधीं मुंबई सरकारनें माहितीवजा एक पत्रक काढलें असून त्यांत लोकांच्या सहकार्याची अपेक्षा व्यक्त केलेली आहे. हिंदुस्थानांतील पोलादाचें वार्षिक उत्पादन १० लाख टनांच्या आसपास आहे. मुंबई प्रांतांतील जनतेला लागणाऱ्या पोलादापैकीं फक्त एक पंचमांश पोलादच मंजूर करण्यांत आलेलें आहे. टनाच्या भाषेंत बोलावयाचें तर चालू वर्षासाठी घरकामाला लागणाऱ्या पोलादाच्या सामानाच्या रूपांत फक्त ६ हजार टन पोलाद मंजूर झालेलें आहे. म्हणजे, दर तिमाहीस फक्त १,५०० टन एवढें पोलादी सामान जनतेला देतां येईल. हें पोलाद मध्यमवर्गीय व कमी पगार मिळविणाऱ्या लोकांच्या सोयीचीं घरें बांधणारांनाच देण्याचें सरकारनें ठरविलें आहे. फेब्रुवारीच्या मध्यापर्यंत जितके अर्ज आले तेवढ्यांना होतें तेवढें सर्व पोलाद सरकारनें दिलेलें आहे. पोलाद वाटप करणाऱ्या अधिकाऱ्याकडे ५ हजार टनांचे अर्ज पडून आहेत. लष्कराच्या उरलेल्या मालांतून २,८०० टन माल मुंबई प्रांताला मिळावयाचा आहे. तो मिळाल्यावर सांठलेल्या अर्जांच्या क्रमवार त्याची विल्हेवाट लावण्यांत येईल. सध्याची पोलादाची टंचाई लक्षांत घेऊन घरें बांधणारांनीं (१) शक्य तोंवर पोलाद वापरूं नये, (२) पोलादाची मागणी किमान तेवढीच करावी (३) आणि आपल्या अर्जाच्या अनुक्रमाप्रमाणें पोलाद मिळेल तेव्हां घ्यावें, अशा सूचना मुंबई सरकारनें केल्या असून त्या योग्यच आहेत.

### हिंदी शेतीसाठी ट्रॅक्टर्स

हिंदुस्थानांत मोठ्या प्रमाणावर यांत्रिक पद्धतीनें शेती करण्याची आवश्यकता तातडीची झाली आहे. त्यासाठी जरूर असणारे ट्रॅक्टर्स –यंत्र-चालित नांगर– अमेरिकेंतून आणण्याची खटपट मध्यवर्ती सरकार करीत आहे. गेल्या बारा महिन्यांच्या कालांत ३९७ ट्रॅक्टर्स हिंदुस्थानांत येतील अशी अपेक्षा होती. परंतु परवा परवापर्यंत फक्त ४७ च प्रत्यक्ष आले आहेत. हिंदुस्थानांतील अमेरिकन सैन्याच्या मालकीचे नांगर दुरुस्त करण्याच्या कामांत मात्र बरीच प्रगति झालेली आहे. हिंदुस्थानांत यांत्रिक नांगरांचा शेतीसाठी उपयोग करण्याचा निर्णय १९४६ च्या सप्टेंबरांत घेण्यांत आला. पण मुख्यतः आसाममध्यें केंद्रित झालेले ट्रॅक्टर्स दुसरीकडे हलवावे कसे, हाच मुख्य प्रश्न होता. तो सोडविण्यासाठी कलकत्त्यांत तात्पुरत्या दुरुस्तीचा कारखाना उघडण्यांत आला. त्या कारखान्यांतून गेल्या वर्षीच्या सप्टेंबर अखेर ७२ ट्रॅक्टर्स दुरुस्त करून ते मद्रास, म्हैसूर व मुंबई प्रांतांना देण्यांत आले. मामुली दुरुस्तीपेक्षा अधिक दुरुस्ती आवश्यक असणारे ट्रॅक्टर्स दिल्ली येथील कारखान्यांत पाठविण्यांत आले आहेत. आतांपर्यंत दिल्लींतील कारखान्यांत २२९ ट्रॅक्टर्स व ७०० टन वजनाचे सुटे भाग आणण्यांत आले आहेत. एका महिन्याच्या अवधींत ८ ट्रॅक्टर्स पूर्णपणें दुरुस्त करण्यांत येऊन जरूर तेथें पाठविण्यांत आले. ट्रॅक्टर्सच्या दुरुस्तीबरोबरच, त्यांना लागणारीं हत्यारेंही बनविण्यांत येत आहेत. हिंदुस्थानांतील निरनिराळ्या प्रांतांकडून आलेल्या मागणीवरून, ट्रॅक्टर्स पुरविणाऱ्या १० केंद्रांची तरी आज गरज दिसून येत आहे. या केंद्रांतून सुमारें १५० ट्रॅक्टर्सची तरी सोय करावी लागेल. येत्या हिवाळ्याच्या आंत ट्रॅक्टर्सच्या दुरुस्तीचें काम पूर्ण करण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत.

### रेल्वेजची विभागणी

हिंदुस्थानांत आतां पाकिस्तान् आणि हिंदुस्थान अशी वसाहतींच्या राज्याच्या स्वरूपाचीं दोन सरकारें अस्तित्वांत येणार असल्यामुळें नॉर्थ वेस्टर्न आणि बंगाल आसाम रेल्वे ह्यांची वाटणी करावी लागणार आहे. नॉर्थ वेस्टर्न रेल्वेपैकीं जो भाग पूर्णपणें पाकिस्तानांत राहील त्याला पहिलेंच नांव कायम ठेवण्यांत येणार असून हिंदुस्थानांतील त्याच रेल्वेच्या भागाला 'ईस्टर्न पंजाब रेल्वे' असें नांव देण्यांत येणार आहे. दिल्ली आणि फेरोझपूर विभागांतील नॉर्थ वेस्टर्न रेल्वेचा भाग हिंदुस्थानांत रहाणार आहे. बंगाल आसाम रेल्वेपैकीं कांहीं रुंद रुळाची रेल्वे पाकिस्तानांत जाणार असून तिला 'ईस्टर्न बंगाल रेल्वे' असें नांव देण्यांत येईल. चांदभारीच्या दक्षिणेकडील रुंद रेल्वेच्या रस्त्याचा एक वेगळा विभाग करण्यांत येऊन तो ईस्ट इंडिअन रेल्वेला सेल्डा विभाग म्हणून जोडण्यांत येईल. गिताल्दा आणि बहादूरपूर यांच्यापलीकडील अरुंद रेल्वे रस्ता हिंदुस्थानांत रहाणार असून त्याला 'आसाम रेल्वे' म्हणून संबोधण्यांत येईल. सरहद्द प्रांत व बंगाल ह्यांच्या सरहद्दी नक्की ठरल्या, म्हणजेच विभागलेल्या रेल्वेजच्या मर्यादा कायमच्या ठरतील.

## दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया, लि.

गेलें वर्ष आर्थिक व राजकीय दृष्ट्या अतिशय हेलकाव्यांचें गेलें, तरी न्यू सिटिझन बँक आपल्या प्रगतीची गति कायम राखूं शकली आहे, असें तिच्या ३१ मार्च, १९४७ अखेरच्या नवव्या वार्षिक वृत्तांतावरून समजून येतें. बँकेचें खेळतें भांडवल २ कोटी, ७० लक्ष रुपयांवरून ३ कोटी, ३७ लक्ष रुपयांवर गेलें आहे; म्हणजे त्यांत २५% भर पडली आहे. बँकांच्या शाखावाढीवर बंधनें घालणारा हिंदुस्थान सरकारचा कायदा डिसेंबर, १९४६ च्या अखेरीचे सुमारास अंमलांत आला. त्या पूर्वीच्या काळांत बँकेनें पिंपळगांव ( नाशिक ), नामपूर ( नाशिक ), शहापूर ( बेळगांव ) व शिवाजीनगर ( पुणें ) येथें उपशाखा काढल्या होत्या. त्या पूर्वीच्या मानानें न्यू सिटिझनच्या शाखांची संख्या अहवालाचे वर्षीं वाढली नाहीं, तरी बँकेचा व्यवहार विस्तार पावत राहिला. देण्याच्या मानानें भरपूर प्रमाणांत पैसे तरते राखण्याच्या बोर्डाच्या धोरणाचा उल्लेख डायरेक्टरांच्या रिपोर्टांत सालोसाल आलेलाच आहे. "ह्या सावधगिरीच्या धोरणामुळें फेब्रुवारी ते एप्रिल, १९४७ ह्या काळांतील अडचणींच्या कसोटीस बँक उतरूं शकली. इतका तरतेपणा राखूनहि, बँकेने आपल्या व्यवसायाच्या किफायतशीरपणास बाध येऊं दिलेला नाहीं, हें हिशेबाच्या तक्त्यांवरून दिसून येईल." तरतेपणा आणि किफायतशीरपणा ह्यांच्या योग्य मिश्रणाचें वरील वर्णन डायरेक्टरांच्या रिपोर्टांत आहे. अहवालाचे वर्षीं बँकेनें ९ लक्ष, ७६ हजार रु. व्याज मिळविलें व ४ लक्ष, ७८ हजार रु. व्याज दिलें. हें उत्पन्न गेल्या वर्षींच्या उत्पन्नापेक्षा ३५% अधिक आहे. कमिशन, ब्रोकरेज, वगैरेच्या रूपानें बँकेस २ लक्ष, ७० हजार रु. मिळाले. बँकेनें शाखावाढीचें पत्करलेलें धोरण तिला कसें फलदायी होत आहे, हें कमिशन, ब्रोकरेज, वगैरेच्या उत्पन्नावरून सिद्ध होत आहे. पैशाची वर्गावर्गी, ड्राफ्ट्सची विक्री, बिलांची वसुली, इत्यादि मार्गांनीं बँकेचें उत्पन्न चांगलेंच वाढलें आहे.

बँकेच्या हिशेबाचे तक्त्यांत मालमत्तेचें भाडें ही एक नवीन बाब आतां सुरू झाली आहे.-बँकेनें पार्शी बझार स्ट्रीटवरील व्हिक्टोरिया बिल्डिंग खरेदी केल्याचें वृत्त "अर्था"मध्यें मागेंच आलें आहे. त्यांत गुंतलेल्या ३ लक्ष, १७ हजार रुपये रकमेवर निव्वळ ३½% व्याज सुटत आहे. बँकेचीं कांहीं खातीं त्या इमारतींत गेलीं असून कांहीं महत्त्वाचीं खातींहि तिकडे लवकरच नेण्यांत येतील. बँकेनें मुंबई शहरीं मोक्याच्या जागेवरील इमारत खरेदी करून, नऊ वर्षांचे अवधींत खरोखरच मुंबईंत खोल पाय रोवला आहे. अहवालाचे वर्षीं बँकेनें आणखी एक उपक्रम केला आहे. आपल्या नोकर वर्गास भासणारी रहात्या बिऱ्हाडांची अडचण लक्षांत घेऊन शींव येथें एक प्लॉट मिळविण्यांत आला आहे. त्याचेवर १२ ते १५ बिऱ्हाडांना पुरेल इतकें तरी बांधकाम तावडतोब पुरें करण्यांत येणार आहे. "आपल्या स्वतःच्या नोकरांसाठीं असें काम हातीं घेणारी आपली पहिलीच बँक असेल" असा यथार्थ अभिमान बोर्डास वाटत आहे. डायरेक्टरांनीं ऑर्डिनरी व प्रेफरन्स भागांवर ५% डिव्हिडंड देण्याचें योजिलें आहे. हा डिव्हिडंडचा दर पहिल्यापासून कायम राखण्यांत आलेला आहे.

न्यू सिटिझनच्या प्रगतीबद्दल आम्हीं सालोसाल लिहीत आलोंच आहों. बँकेची मुंबईंत स्थापना करण्यापासूनच्या सर्व योजना आखून त्या यशस्वी करण्याचें श्रेय मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. भाऊसाहेब देशपांडे ह्यांनीं मिळविलें आहे आणि त्यांचा उत्साह व चिकाटी हीं अद्याप पूर्ववत् कायम आहेत. त्यांच्या वाढत्या व्यवसायक्षेत्राबरोबर त्यांच्या योजनांचें क्षितिजहि वाढलें आहे, आणि महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीसंबंधीं त्यांची तळमळ सुप्रसिद्ध आहे. श्री. देशपांडे ह्यांनीं स्थापन केलेल्या न्यू सिटिझनला ३१ जुलै रोजीं १० वर्षें पुरीं होत आहेत व त्याच दिवशीं तिची वार्षिक सभा भरत आहे. ह्या निमित्तानें आम्हीं बँकेस असंड यश चिंतितों.

---

### दि सुप्रीम म्युच्युअल अॅ. कं. लि., पुणें

वरील कंपनीनें १९४६ सालीं २३,८५,००० रुपयांचें काम पुरें केलें. गेल्या वर्षींच्या कामाच्या आकड्यापेक्षा हा आकडा ४२ टक्क्यांनीं मोठा आहे. कंपनीच्या प्रत्येक पॉलिसीची सरासरी किंमत २,४५३ रु. आहे. विमा पॉलिसीची सरासरी किंमत वाढत गेल्यानें, खर्चाचें प्रमाण उतरण्यास सहाय होतें, ही फायद्याची गोष्ट आहे. अहवालाचे वर्षीं हप्त्यांचें एकूण उत्पन्न २,०३,६६४ रु. भरलें. गेल्या वर्षीपेक्षा हें उत्पन्न ५५ टक्के अधिक आहे. ऑर्गेनायझेशन खर्चाची ३ हजार रुपयांची रकम आतां पूर्णपणें लिहून टाकली आहे. कंपनीनें कराची, हुबळी, धुळें व नागपूर येथें शाखा उघडल्या आहेत. कंपनीच्या मूल्यमापनाचें काम प्रो. जी. एस. दिवाण, अॅक्चुअरी, ह्यांचेकडे सोपविण्यांत आलेलें आहे. कंपनीचे मॅनेजर व अधिकारपरत्वें डायरेक्टर श्री. व. न. म्हैसूर ह्यांनीं कंपनीचा व्यवहार वाढविण्यांत उत्कृष्ट यश मिळविलें आहे. मूल्यमापनाचा अहवाल हातीं आल्यावर कंपनीविषयीं अधिक विस्तारानें आम्हीं लिहूं.

---

### व्यापारी—भारत

हिंदुस्थान सरकार व प्रांतिक सरकारें उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी कसून प्रयत्न करीत आहेत. मध्यप्रांत व महाराष्ट्र ह्या दोघांनाहि आपला मागसलेपणा दूर करण्यासाठी अद्याप पुष्कळ मजल गाठावयाची आहे. व्यापार आणि उद्योगधंदे ह्यांच्या वाढीच्या सर्वत्र चालू असलेल्या प्रयत्नांची माहिती घेऊन आपण कोठें उभे आहोंत ह्याची कल्पना आणून देण्याच्या उद्देशानें वरील मासिक नागपूर येथें श्री. नारायण मोरेश्वर केळकर ह्यांनीं जुलैपासून सुरू केलें आहे, त्याचा पहिला अंक आमचेकडे आला आहे. व्यापार व उद्योगधंदे ह्या विषयांस वाहिलेलीं कांहीं नियतकालिकें आज मराठींत प्रसिद्ध होत आहेत, त्यांत व्यापारी-भारताची स्वागताई भर पडत आहे. व्यापारी नियतकालिकांचें महत्त्व हितसंबंधी लोकांस पटत चाललें असून नव्या नियतकालिकांस प्रोत्साहन मिळण्याजोगी जागरूकता आतां निर्माण झाली आहे, हें आपल्या आर्थिक प्रगतीचें सुचिन्हच समजलें पाहिजे. श्री. केळकर हे अनुभवी पत्रकार आहेत; त्यांच्या प्रयत्नांस आम्ही सुयश चिंतितों. मासिकाची वार्षिक वर्गणी ५ रु. आहे.

---

### उशीरा कां होईना, परंतु पाऊस आला

पावसाच्या अभावीं, मुंबई प्रांतांत दुष्काळी परिस्थिति निर्माण होण्याची भीति निर्माण झाली होती. परंतु, उशीरा कां होईना परंतु सर्वत्र पुरेसा पाऊस आतां पडला असल्याकारणानें तात्कालिक चिंता दूर झाली आहे. माताच्या लावण्या लांबणीवर पडल्या होत्या त्या आतां गुडघाभर पाण्यांत नेहमीप्रमाणें होऊं शकतील. विजापूर, सोलापूर इत्यादि विभागांतहि पाऊस झाला आहे.

### कोयना व काळी नदी विद्युत् योजनांची प्रगति

कोयना योजना—( विजेची निर्मिती २,००,०००, किलो-वॅट, थोडेंबहुत पाणी शेतीसाठी ) मुंबई सरकारनें सातारा जिल्ह्यांतील कोयना नदीवर वीज उत्पन्न करण्यासाठी धरण बांधण्याचें ठरविल्यावर ता. १४ डिसेंबर १९४६ रोजीं, कोणत्या प्रकारचें धरण बांधावयाचें व त्याला किती खर्च येईल इत्यादि तपशीलाची चौकशी व पहाणी करण्याला मंजुरी दिली. ह्या कामासाठी लागणाऱ्या कांहीं एंजिनिअर्स वगैरेंना इतर कामांतून मुक्त करण्यांत आलें व जानेवारी १९४७ मध्यें हेलवाक येथें प्रस्तुत योजनेसाठी 'कचेरी उघडण्यांत आली. हिंदुस्थान सरकारच्या भूस्तर शास्त्रज्ञानें धरणाच्या जागेसंबंधीं व इतर बांधकामाबद्दल आपल्या सूचना सादर केल्या आहेत. मुंबईच्या गारलिक अँड कंपनीकडे बोअरिंगचें काम सोपविण्यांत आलें असून तें काम ठरल्याप्रमाणें तडीस जाईल असा अंदाज आहे. प्राथमिक पहाणी करणाऱ्या लोकांची रहाण्याची सोय करण्यांत बऱ्याच अडचणी असतांही, धरणाची जागा, नळ टाकण्याचा मार्ग, प्रत्यक्ष विद्युत् निर्मितीची जागा इत्यादींबाबतींत काम चालूं करण्यांत आलें आहे.

काळी नदी योजना—(विद्युत् निर्मिती ८०,००० किलोवॅट) ह्या कामासाठी प्राथमिक पहाणीची मंजुरी ता. ७ जानेवारी १९४७ रोजीं देण्यांत येऊन काम मेसर्स असोशिएटेड कन्सल्टिंग एंजिनिअर्स (इंडिआ) ह्या कंपनीकडे सोपविण्यांत आलें. कंपनीनें इंग्लंडमधील एंजिनिअर्सची मदत घेऊन फेब्रुवारींत कामाला प्रारंभ केला. आतांपर्यंत काळी नदी, पांढरी नदी, आणि काळ्या नदीची एक उपनदी कान्हेरी, ह्यांची धरणाच्या दृष्टीनें पहाणी झालेली आहे. मध्यवर्ती सरकारच्या भूस्तर शास्त्रज्ञाचा रिपोर्टहि आलेला आहे. कंपनीनें वीज निर्मितीच्या शक्यतेबद्दलचा आपला अहवाल ह्या वर्ष अखेर देण्याचें ठरविलें आहे.

---

### खडकवासला तलावाचें काम लवकर हातीं घ्या.

संपादक " अर्थ " यांस, सा. नं. वि. वि.

मुठा कॅनाल हा मुख्यत्वेंकरून पुण्याच्या पूर्व भागांत नेहमी दुष्काळ पडत असत सबब शेतकऱ्यांकरितां बांधला गेला, असें पुणें ग्याझेटीअरवरून दिसतें. हा कॅनॉल पुणें शहरांतून जात असल्यामुळें प्रयोगादाखल पुणें शहराला पिण्यासाठी पाणी दिलें. पुढें भरपूर पाणी मिळूं लागलें, वस्तीही वाढत गेली. तलाव न वाढल्यामुळें शेतकऱ्यांचें पाणी हळूहळू बंद पडत चाललें व आतां तर आठ महिनेच फक्त शेतकऱ्यांना ते मिळतें. उसाला तर अजीबात पाणी मिळत नाहीं. नीरा, गोदावरी, प्रवरा कालव्यांवर उसाला भरपूर पाणी मिळाल्यामुळें तिकडील लोकांनीं लाखो रुपये मिळवले ! मुठा कॅनॉलवर शेतकरी मात्र नुसतेच आकाशाकडे बघत राहिले. तलाव वाढवण्याबद्दल योजना झाली आहे. पण ती अद्याप हातांत घेतली नाहीं. वीर तलाव व इतर तलाव यांच्या योजना आधीं हातांत घेतल्या आहेत व हा उपयुक्त व सर्वांत जुना तलाव मागें टाकला. कां तें समजत नाहीं.

आतां पुणें शहरहि भयंकर वाढत आहे. आणखी पांच-दहा वर्षांत ( १ ) वॉर ॲकॅडमी, ( २ ) महाराष्ट्र युनिव्हर्सिटी, ( ३ ) केमिकल लॅबोरेटरी, ( ४ ) किर्लोस्कर कारखाना व इतरही खूप कारखाने पुण्यांत निघणार आहेत. या सर्वांना पाणी पुरवावयाचें आहे. तेव्हां खडकवासला धरण वाढवण्याचें काम सरकारनें तावडतोब हातीं घेणें जरूर आहे. 'मुंबई सरकार इकडे लक्ष देईल काय ?

के. वी. भागवत, बी. एजी.

### पीपल्स कॉमनवेल्थ रिजनल डेव्हलपमेंट असोसिएशन

आपल्या देशांतील सध्याच्या परिस्थितींत विस्कळित व दुबळ्या जनतेला झेपतील, पचतील व मानवतील अशा मार्गांनीं तिला बलवान, संघटित, स्वयंप्रकाश, स्वावलंबी व स्वसंरक्षणांस समर्थ करण्यासाठी जरूर असणाऱ्या " प्रादेशिक सुधारणा व संघटना कार्यांचीं मूलतत्त्वें व निरनिराळीं अंगें व त्यांची स्वावलंबी व स्वयंपूर्ण पद्धतशीर उभारणी " या विषयावर दहा व्याख्यानें बुधवार ता. २७ आगस्ट ते रविवार ता. २८ सप्टेंबर, १९४७ या महिन्यांत दर बुधवारीं व शुक्रवारीं सायंकाळीं ६ ते ७–३० पर्यंत २८२, सदाशिव पेठ, पुणें येथें होतील.

या व्याख्यानमालेस येणारांनीं याच कालांतील दर रविवारीं सिंहगड किल्याच्या दक्षिण पायथ्याशीं कल्याण गांवीं या कामासाठी चालूं केलेल्या केंद्राला भेटी देऊन प्रत्यक्ष पाहणी, चर्चा व विचारविनिमय करण्याची योजना आहे.

प्रवासखर्च, बोलपट, चित्रपट, स्लाइडस, छपाई वगैरेसाठीं प्रत्येकीं २५ रुपये खर्च येईल. या कार्यक्रमाचा फायदा घेऊं इच्छिणारांनीं २८२ सदाशिव पेठ, पुणें २ येथें श्रीयुत शंकर रामचंद्र भागवत यांच्याकडे चौकशी करावी.

२५ रुपये भरून नांवें नोंदविण्याची शेवटची तारीख १५ आगस्ट, १९४७ ही आहे.

---

**लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय**—मुंबई प्रांतिक सरकारच्या शिक्षण आणि उद्योगधंदे खात्यानें संग्रहालय संस्थेच्या सेवकवर्गास महागाई भत्ता देण्यासाठी चालू सालाकरितां ७,००० रु. ची देणगी दिली आहे.

**नियतकालिकांचीं मुखपृष्ठें**—न्यूजप्रिंटवर छापण्यांत येणाऱ्या नियतकालिकांचीं मुखपृष्ठें आर्ट पेपरवर छापण्यास परवानगी द्यावी अशी मागणी मध्यवर्ती सरकारकडे अनेक चालकांनीं केली होती. सरकारनें या मागणीचा विचार करून मुखपृष्ठापुरती तशी परवानगी दिली आहे. आंतील पानें आर्ट पेपरवर छापण्यासाठी मात्र आगाऊ परवानगी मागणें जरूर आहे.

१ जुलैला प्रसिद्ध झालें
**व्यापारी भारत**
उद्योगधंदे व व्यापार यांच्या विकासाला वाहिलेलें
—पहिलें मराठी मासिक—
संपादकः—नारायण मोरेश्वर केळकर
महाराष्ट्रांतील व मध्यप्रांतांतील व्यापारविषयक हालचाली, नव्या उद्योगधंद्यांची स्थापना, हिंदुस्थान सरकारच्या व्यापारविषयक घोषणा व उद्योगधंदे वाढीचें धोरण तसेंच व्यापारविषयक सरकारी वृत्त यांची संकलित माहिती देऊन व्यापारी वर्गाला मार्गदर्शन करणारें मासिक.
वा. व. ५ रु. किरकोळ अंक ८ आणे
ऑगस्टच्या अंकांत वर्गणीदारांसाठीं खास सवलतीची जाहिरातींची योजना पहा. जाहिरातीकरितां लिहा.
व्यापारी भारत कार्यालय, स. नं. १, घ. नं. ७१
कॉलेज लेन, नागपूर शहर [ सी. पी. ]

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून )


सातहिक बंद भाव

| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार १५।७।४७ | बुधवार १६।७।४७ | गुरुवार १७।७।४७ | शुक्रवार १८।७।४७ | सोमवार २१।७।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २४१०-८; २५२७-८ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड | ३० | २१५५ | २१८५ | २१६६—४ | २१८७—८ | २१४० |
| ६३८; ४५७-८ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४१९—८ | ४२६—८ | ४२४—८ | ४२३—० | ४१६ |
| ६५; ३६-४ | ०-८-०S | ऑगस्ट | बेंगाल स्टील | १० | २९-१२ | ३०—६ | २९-१२ | ३०—० | २९—१ |
| ७१-४; ४४-१० | ०-१४-०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | ३६-१२ | ३७—६ | ३४-१४ | ३६-१२ | ३५-१२ |
| | 'बोनस शेअर' | | | | | | | | |
| २२७७-८; २१३२-८ | ४०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | १२०५ | १२१० | ११७५ | ११८५ | ११७०—० |
| ११८०; ६५८ | १३-०-०S | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ६७२ | ६६८ | ६७१ | ६७० | ६७० |
| ९९९; ६६० | २७-०-० | मे | स्वदेशी | १०० | ६७० | ६७० | ६५८ | ६६३ | ६६० |
| ५६७; ३९८ | २-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | ३४७ | ३४१ | ३३६ | ३३५ | ३३१ |
| ५५२; ३१४ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ३२७ | ३२६ | ३२४ | ३२२ | ३२१ |
| ५७१; ३२३ | १२-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३६३ | ३६१ | ३५४—८ | ३५४ | ३४८ |
| ५९४; ३२५-८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३७० | ३७० | ३६३ | ३६३ | ३६० |
| ७-४-६; ४-८-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ४-११—६ | ४-१२ | ४—१० | ४—१० | ४—९ |
| २९-१; १६-१२ | ०-१३-९ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १७—४ | १७—४ | १६—१५ | १७—१ | १६-१२-६ |
| ६-११-६; ३-३-६ | ०-२-६ | मे | ,, डिफर्ड | १ | ३—५—६ | ३—५—६ | ३—४—६ | ३—४—६ | ३—३-६ |
| १०९२-८; ७३५ | २१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ६२५ | ६१० | ६२५ | ६३५ | ६३० |
| २७८; २२५ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | १८३—८ | १८३ | १८१—८ | १८१—० | १७९—८ |
| ३७५; २४० | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २८४ | २८४ | २८३—० | २८१—० | २८० |
| ९१०; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५४७—८ | ५३७—८ | ५३५ | ५३२—८ | ५२१—४ |
| ६०-१० ३६-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ३६ | ३५—६ | ३४-१४ | ३५—२ | ...... |

**कनिष्ठ नौकर वर्गाला भत्ता—मुंबई** सरकारनें कमी पगार मिळणाऱ्या नौकरांना अधिक बोनस देण्याचें ठरविलें आहे. सेंट्रल पे कमिशनच्या अहवालांत शिफारस केलेल्या नव्या पगारांची श्रेणी अंमलांत येण्यापूर्वी या नौकरांना तातडीची मदत म्हणून हा बोनस देण्यांत येणार आहे. १९४७ च्या पहिल्या सहामहिन्यापुरता बोनस देण्यांत येणार असून या काळांत जितके महिने सतत नौकरी केली असेल त्या महिन्यांना मासिक तातडीच्या मदतीच्या आकड्यानें गुणून जी रक्कम येईल तेवढें बोनस मिळावयाचें आहे.

**दारूबंदीच्या कार्यक्रमाबद्दल संस्थानें उदासीन—गुजराथी,** काठेवाडी आणि दाक्षिणी संस्थानांपैकीं ३०० संस्थानांना दारूबंदीच्या कार्यक्रमांत त्यांचें सहकार्य मिळविण्यासाठी मुंबई सरकारनें एका परिषदेचें आमंत्रण दिलें होतें. परंतु संस्थानांकडून या बाबतींत फारशी उत्सुकता दाखविण्यांत आलेली नाहीं. संस्थानांच्या हद्दींतून दारूची चोरटी आयात बंद करण्यासाठी मुंबई सरकारनें ही परिषद भरविण्याचें ठरविलें होतें.

**कापडविषयक धोरणावर चर्चा—हिंदुस्थान** सरकारनें प्रांतिक मंत्र्यांची एक सभा दिल्ली येथें ता. २८ जुलै रोजीं भरविण्याचें ठरविलें आहे. त्या सभेंत सरकारच्या सूत व कापडविषयक धोरणाचा आढावा घेतला जाईल.


धूतपापेश्वर औषधें

श्री धूतपापेश्वर पनवेल लिमिटेड पनवेल-कुलाबा




पुणें डेपो—सिटी पोस्टासमोर, : नागपूर—महाल रोड,

कोल्हापूर—महाद्वार रोड.

## नव्या भांडवल उभारणीस परवानगी

| कंपनी | धंदा | मान्यता दिलेलें भांडवल ( रु. ) | शेरा |
|---|---|---|---|
| सिंप्लेक्स मिल्स कं. लि., मुंबई | रेशमी कापड व सूत | ७,००,००० | जु. कं. चें नवीन भांडवल |
| अमलगमेटेड डेअरीज लि., मुंबई | दूध व दुधाचे पदार्थ | १०,००,००० | नवी कंपनी |
| इंडिआ इलेक्ट्रिक अँड एंजिनिअरिंग कॉर्पोरेशन लि., मुंबई | विजेच्या तारा व उपकरणें | ३५,००,००० | नवी कंपनी |
| भारत कोल्ड स्टोअरेज, फरुकाबाद ( सं. प्रांत ) | बटाटे टिकविणें | १२,००,००० | नवी कंपनी |
| बिकानेर इंडस्ट्रिअल कॉर्पोरेशन लि., बिकानेर | साखर, साबण | ६५,००,००० | नवी कंपनी |
| शॉ वालेस अँड कं. लि, कलकत्ता | जनरल ट्रेडर्स व एजंटस् | १,५०,००,००० | खाजगी कंपनीचें सार्वजनिक कंपनींत रूपांतर |
| मेयर मिल्स लि., मुंबई | कापड व सुताची गिरणी | ३०,००,००० | जु. कं. चें नवीन भांडवल |
| औरंगाबाद मिल्स लि., मुंबई | कापड व सुताची गिरणी | २८,००,००० | जु. कं. चें नवीन भांडवल |
| अंबिका एअर लाइन्स लि., मुंबई | विमान वहातूक | १०,००,००० | जु. कं. चें नवीन भांडवल |
| मद्रास प्रेसिडेन्सी एअरवेज लि., त्रिचनापल्ली | विमान वहातूक | ७०,००,००० | नवी कंपनी |

**मॉस्कोंतील हिंदी वकिलाचें प्रयाण**--मॉस्कोमधील पहिला हिंदी राशिअन वकील म्हणून श्रीमती विजयालक्ष्मी पंडित ह्या खास विमानानें ता. ३ ऑगस्ट रोजीं प्रयाण करतील असें समजतें. त्यांच्या बरोबर एक चिटणीस व एक दुभाषाहि जाणार आहे. हिंदी वकिलातींतील कांहीं मंडळी आधींच रवाना झाली आहेत.

**तेलाची युद्धकालीन गरज**—अमेरिका सध्या रोज तेलाचीं ५१ लाख पिंपें खाणींतून उपशीत आहे. पुनः युद्ध झालेंच तर एवढ्या उत्पादनानें काम भागण्यासारखें नसल्यानें मध्यपूर्वेतील देशांतून तेल आयात करावें, असें मत अमेरिकन दुय्यम युद्धमंत्र्यानें व्यक्त केलें आहे. अमेरिकेची युद्धकालीन तेलाची गरज ६० ते ९० लाख पिंपें, इतकी आहे.

**युरोप मदत परिषद्**—मार्शल योजने प्रमाणें युरोपला मदत करण्यासाठी २२ युरोपिअन राष्ट्रांना आमंत्रणें करण्यांत आलीं होतीं. त्यापैकी राशिआच्या कक्षेंतील ८ राष्ट्रें सोडून बाकीच्यांनीं परिषदेचें आमंत्रण स्वीकारलें.


# दि रत्नाकर बँक लिमिटेड.

ऑफिसें:—१ कोल्हापूर, २ शाहुपुरी, ३ सांगली, ४ मिरज, ५ जयसिंगपूर.

चेअरमनः—नामदार बी. वी. पाटील, बी. ए., एलएल. बी., डेव्हलपमेंट मिनिस्टर, सांगली स्टेट.

| | रु. |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | २०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ६,२७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ३,२३,६०० |
| खेळतें भांडवल अंदाजें | ३५,००,००० |

—: अबावत् बँकिंग व्यवहार केले जातात. :—

एल्. एन्. शहा,
बी. कॉम., सी.ए.आय. आय. बी.
मॅनेजर

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

मुख्य कचेरी:—लक्ष्मी रोड, पुणें.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल:— | रु. ५०,००,००० |
| खपलेलें भांडवल:— | रु. ३२,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल:— | रु. १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड:— | रु. ३,९०,००० |
| एकूण खेळतें भांडवल:— | रु. २,००,००,००० |

--:बोर्ड ऑफ डायरेक्टर्स:--

श्री. धों. कृ. साठे, (चेअरमन) श्री. वा. पुं. वर्दे (व्हा. चेअरमन)
श्री. न. गं. पवार, श्री.श्री. गो. मराठे, श्री.मा. रा. जोशी,
श्री. फ. दो. पदमजी, श्री. मा वि. शहा,
श्री. शं. ल. किर्लोस्कर, श्री. भा. म. गुप्ते,
श्री. मो. रा. ढमढेरे.

शाखा:–डेकन जिमखाना (पुणें), खडकी, मुंबई (फोर्ट), मुंबई ( गिरगांव ), नाशिक, चाळीसगांव, धुळें, जळगांव, फैजपूर ( पे. ऑफिस ), नागपूर ( सिताबर्डी ), नागपूर ( इतवारी ), रत्नागिरी, कोपरगांव, हुबळी, सोलापूर, कल्याण इ.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शिवाय ट्रस्टी आणि एक्झिक्यूटरचे व्यवहाराबाबत चौकशी करावी.

चिं. वि. जोग
मॅनेजर.








हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.